शासकीय कार्यालये-

शिपायांच्या जागेवर स्त्री कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसटीआर-१०७४/११,
सचिवालय, मुंबई ३२,
दिनांक २० जुलै १९७६

**शासकीय परिपत्रक**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शिपायांच्या (चतुर्थ श्रेणी) जागा भरताना विभागाध्यक्ष/कार्यालय प्रमुख हे स्त्री उमेदवारांची नियुक्ती करीत नाहीत. याबाबत असे समजते की सेवा योजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी हे स्त्री उमेदवारांची नांवे कार्यालयांना पुरस्कृत करीत नसावेत किंवा विभागाध्यक्ष/कार्यालय प्रमुख हे सेवा योजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी यांचेकडे शिपायांची पदे भरताना स्त्री उमेदवार या पदासाठी पात्र आहेत असे मागणीपत्रात नमूद करीत नसावेत. सेवा योजन कार्यालये / समाज कल्याण अधिकारी यांचेकडे स्पष्ट मागणी केल्याशिवाय स्त्री उमेदवार पाठविणार नाहीत. शासनाने याबाबत संपूर्ण विचार केला आहे व शासनाचे असे मत आहे की, काही शिपायांच्या जागांवर स्त्री उमेदवारांची नियुक्ती करण्यास काहीच हरकत नाही. म्हणून शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१) शिपायांच्या जागा भरतांना सर्व विभागाध्यक्ष/कार्यालय प्रमुख यांनी सेवा योजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी यांचेकडे विहीत मागणी प्रपत्रात स्त्री उमेदवारांच्या पात्रतेबाबतचा स्तंभ न चुकता भरावा.

(२) ज्या विभागात/कार्यालयात मोठ्या प्रमाणात शिपायांच्या जागा उपलब्ध असतील त्या विभागात/कार्यालयात कमीत कमी ५ ते १० टक्के जागा स्त्री उमेदवारांकरीता राखून ठेवाव्यात.

१. शासनाचे असे मत आहे की कार्यालयातील शिपायांच्या कांही जागांवर स्त्री उमेदवारांची नेमणूक करुन स्त्रियांना अयोग्य नसलेली अशी कामे त्यांचेकडून करुन घेण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म. शं. मोकाशी,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्य मंत्री व उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
निरनिराळ्या सचिवालयीन विभागांखालील इतर सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख,
सर्व सचिवालयीन विभाग.

......